रेलवे भर्ती बोर्ड / RAILWAY RECRUITMENT BOARDS

सी ई एन ०६/२०२४ - एन टी पी सी पूर्व स्नातक स्तर - CEN - 06/2024 - NTPC Under Graduate Level

# RRB NTPC UG 2024 CBT 2

## Under Graduate Level · CEN 06/2024 · Question Paper Compilation

**Marathi**

All 1 Shifts (Sets) · Official Answer Key

## About this Compilation

This booklet compiles all **1 shift papers** of the **RRB NTPC UG 2024 CBT 2** examination (CEN 06/2024) in **Marathi**, with the correct option marked as per the official answer key.

✓ Correct option (highlighted green)


**6 of these 120 questions are shown in English.** RRB did not release them in Marathi to any candidate whose response sheet we could reach, so the official English version is printed instead and marked with an ENGLISH chip. Nothing here is machine translated.

### How to use

- Use the **Index** page to jump directly to any set (clickable).
- Questions appear in shift order, numbered 1 onward within each set.
- Diagram and wide-table questions appear at full width at the end of their set.
- The correct answer is highlighted in green with a tick.

### More from QMaths

Check your marks, normalized score and zone-wise rank free at **rank.qmaths.in**. Master English vocabulary with the **Blackbook** app.


***Toppers' Choice, Blackbook of English Vocabulary, Now available in App format : DOWNLOAD NOW***

# Index — All Sets (click to open)

Set 1 — 20 Dec 2025
4:30 PM - 6:00 PM

**Q1**

मार्च 1930 मध्ये दांडी यात्रेचे नेतृत्व खालीलपैकी कोणी केले?

A. महात्मा गांधी ✓
B. जवाहरलाल नेहरू
C. लाला लाजपत राय
D. सुभाषचंद्र बोस

**Q2**

भारतातील निवडणुकांच्या आयोजनात, मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर देखरेख ठेवण्याची आणि अंतिम निवडणूक निकाल अधिकृतपणे घोषित करण्याची जबाबदारी कोणत्या प्राधिकरणाची असते?

A. मतदान अधिकारी
B. निवडणूक निर्णय अधिकारी ✓
C. मुख्य निवडणूक निरीक्षक
D. मतदान केंद्राध्यक्ष

**Q3**

'इंडियन रेनेसान्स: द मोदी डिकेड' चे संपादक खालीलपैकी कोण आहेत?

A. सौमित्र चॅटर्जी
B. डॉ. ऐश्वर्या पंडित ✓
C. अरुण शौरी
D. डॉ. के. एस. चौहान

**Q4**

इंग्रजी वर्णक्रमानुसार दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

EDG, CBE, AZC, YXA, WVY, ?

A. USW
B. VTU
C. UTW ✓
D. VSW

**Q5**

इंग्रजी वर्णक्रमानुसार, खालील चारपैकी तीन अक्षर समूह जोड्यांत एका विशिष्ट प्रकारे समानता आहे आणि त्यानुसार त्या एक गट तयार करतात. तर ह्या गटात न बसणारी अक्षर समूहाची जोडी निवडा.
(सूचना: गटात न बसणारी अक्षरसमूह जोडी ही तिच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षरसमूहातील तिच्या स्थानावर आधारीत नाही.)

A. MN – SV ✓
B. QR – WX
C. IJ – OP
D. AB – GH

**Q6**

D, E, F, G, O, P आणि Q या सर्व व्यक्ती उत्तरेला तोंड करून एका सरळ रेषेत बसल्या आहेत. E च्या डावीकडे फक्त तीन व्यक्ती बसलेल्या आहेत. G च्या उजवीकडे फक्त O व्यक्ती बसला आहे. G आणि F च्या मध्ये फक्त तीन व्यक्ती बसल्या आहेत.
Q हा P च्या डावीकडे कुठेतरी बसला आहे परंतु D च्या उजवीकडे कुठेतरी बसला आहे. D आणि P च्या मध्ये किती लोक बसले आहेत?

A. चार
B. एक
C. तीन ✓
D. दोन

**Q7**

खाली दिलेल्या दोन्ही त्रिकांतील प्रारुपाप्रमाणे प्रारुप असणारे त्रिक निवडा. दोन्ही त्रिक एकाच प्रारुपाची आहेत.

BATH – HBAT – THBA
TOYS – STOY – YSTO

A. ABLE – EABL – LEAB ✓
B. TOMB – OMTB – MTOB
C. CART – ACTR – CTAR
D. LOVE – OVEL – VELO

Blackbook Vocabulary — Now in the App! ► Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in

**Q8**

रोहित नावाच्या किराणा विक्रेत्याला, प्रति किलो ₹145.50 किमतीचे मिश्रण मिळविण्यासाठी अनुक्रमे प्रति किलो ₹130 आणि ₹150 किमतीचे दोन प्रकारचे बेसन किती प्रमाणात मिसळावे लागेल?

- A. 31 : 7
- B. 31 : 9
- C. 7 : 31
- D. 9 : 31 ✓

**Q9**

जर 'A' म्हणजे '÷' असेल, 'B' म्हणजे '×' असेल, 'C' म्हणजे '+' असेल आणि 'D' म्हणजे '−' असेल, तर खालील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

138 B 2 C 24 A 4 D 8 = ?

- A. 274 ✓
- B. 272
- C. 271
- D. 273

**Q10**

खालील संचांतील संख्यांमध्ये असणाऱ्या संबंधाप्रमाणे संबंध असणाऱ्या संख्यांचा संच निवडा.
(सूचना: संख्यांना त्यांच्या घटक अंकांत वेगळे न करता, पूर्ण संख्यांवर क्रिया कराव्यात. उदा.13 – 13 या संख्येने/संख्येवर क्रिया करताना , 13 वर/ने बेरीज/वजाबाकी/गुणाकार इ. क्रिया केली जाऊ शकते. मात्र 13 ला 1 आणि 3 असे वेगळे करणे आणि त्यानंतर 1 आणि 3 यांवर गणिती क्रिया करणे येथे अभिप्रेत नाही.)

(5, 14, 24)
(3, 10, 16)

- A. (7, 18, 32) ✓
- B. (9 , 14, 24)
- C. (4, 12, 28)
- D. (6, 8, 12)

**Q11**

भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुसूचीमध्ये पंचायतींचे अधिकार, प्राधिकार आणि जबाबदाऱ्यांची यादी आहे?

- A. नववी अनुसूची
- B. अकरावी अनुसूची ✓
- C. बारावी अनुसूची
- D. दहावी अनुसूची

**Q12**

A आणि B एक काम 14 दिवसांत पूर्ण करतात. एकटा A ते काम 42 दिवसांत करू शकतो, तर त्याच कामाच्या एक तृतीयांश काम एकटा B ________ (दिवसांत) पुर्ण करेल.

- A. 14
- B. 7 ✓
- C. 21
- D. 28

**Q13**

खालीलपैकी कोणती नदी भारताच्या वाळवंटातील सर्वात लांब नदी आहे?

- A. यमुना
- B. गंगा
- C. ब्रह्मपुत्रा
- D. लूनी ✓

**Q14** ENGLISH

Which team was the winner of the Vijay Hazare Trophy 2024-25?

- A. Karnataka ✓
- B. Gujarat
- C. Haryana
- D. Vidarbha

**Q15**

उत्तरेकडे तोंड करून असलेल्या 48 लोकांच्या रांगेत, मोहित उजव्या टोकापासून 14 व्या स्थानावर बसला आहे. जर हरिणी डाव्या टोकापासून 15 व्या स्थानावर बसली असेल, तर मोहित आणि हरिणी यांच्यामध्ये किती लोक बसले आहेत?

- A. 21
- B. 19 ✓
- C. 16
- D. 18

Blackbook Vocabulary — Now in the App! ► Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in

**Q16**

राधे A स्थानापासून गाडी चालवायला सुरुवात करतो आणि पश्चिमेकडे 32 km जातो. त्यानंतर तो डावीकडे वळण घेत 30 km गाडी चालवतो, पुन्हा तो डावीकडे वळतो आणि 49 km गाडी चालवतो. त्यानंतर तो पुन्हा डावीकडे वळतो आणि 46 km गाडी चालवतो. सरतेशेवटीसुद्धा तो डावीकडे वळण घेत 17 km गाडी चालवतो आणि P स्थानावर थांबतो. तर A स्थानावर पुन्हा पोहोचण्यासाठी त्याला किती अंतर (सर्वात कमी अंतर) आणि कोणत्या दिशेने गाडी चालवावी लागेल? (निर्दिष्ट केलेले नसतील तोवर सर्व वळणे केवळ 90° वळणे आहेत.)

A. 13 km दक्षिणेकडे

B. 16 km दक्षिणेकडे ✓

C. 15 km पश्चिमेकडे

D. 12 km दक्षिणेकडे

**Q17**

भारतातील खालीलपैकी कोणत्या भाषेचे भाषिक बहुतेकदा आंतरराष्ट्रीय सीमांना लागून असलेल्या हिमालयीन पट्ट्यापर्यंत मर्यादित आहेत?

A. ऑस्ट्रिक

B. तिबेटी-बर्मन ✓

C. द्रविडियन

D. इंडो-आर्यन

**Q18**

कृषी उपक्रमांचे विविधीकरण ग्रामीण समृद्धीमध्ये कसे योगदान देते?

A. पारंपरिक पीक पद्धतींवर अवलंबित्व वाढवून

B. उत्पन्नाचे पर्यायी स्रोत उपलब्ध करून देऊन आणि लवचिकता सुधारून ✓

C. केवळ मुख्य पिकांवर लक्ष केंद्रित करून

D. कृषी उत्पादकता कमी करून

**Q19**

एप्रिल 2024 ह्या महिन्यात प्रकाशित झालेल्या 'द लॉ अँड स्पिरिच्युअलिटी : रिकनेक्टिंग द बॉण्ड' या पुस्तकाचे लेखक कोण?

A. रमण मित्तल आणि सीमासिंग ✓

B. अशोककुमार आणि ओ. पी. मनोचा

C. गीतासिंग आणि आरिफखान भारती

D. आर. के. पचनंदा आणि उत्तमकुमार सिन्हा

**Q20**

पुढीलपैकी कोणते निरीक्षण रासायनिक अभिक्रिया घडली आहे हे दर्शवते?

A. आकृतीतील बदल

B. आकारातील बदल

C. तापमानातील बदल ✓

D. पोत बदलत नाही

**Q21**

इंग्रजी वर्णमालाक्रमावर आधारित, खालील चारपैकी तीन अक्षर-समूह जोड्यांत एका विशिष्ट प्रकारे समानता आहे आणि त्यानुसार त्या एक गट तयार करतात. तर ह्या गटात न बसणारी अक्षर-समूहाची जोडी निवडा. (सूचना: गटात न बसणारी अक्षरसमूह जोडी ही तिच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षरसमूहातील तिच्या स्थानावर आधारीत नाही.)

A. GED

B. SQO ✓

C. KIH

D. ZXW

**Q22**

सांस्कृतिक मंत्रालयानुसार, खालीलपैकी कोणते, भाषा ही अभिजात असल्याचे घोषित केल्याचा परिणाम दाखवते?

A. राष्ट्रीय एकात्मता

B. जागतिक सहकार्य

C. वाढीव साक्षरता दर

D. रोजगाराच्या संधी ✓

**Q23**

आयपॅडची छापील किंमत ₹960आहे. तो प्रत्येकी 25%च्या दोन सलग सवलतींसह विकला, त्यानंतर रोख रकमेवर अतिरिक्त 15% सवलत दिली. तर रोख सवलतीनंतर अंतिम विक्री किंमत (₹ मध्ये) किती असेल?

A. 461

B. 460

C. 459 ✓

D. 456

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play

**Q24**

एका विशिष्ट सांकेतिक भाषेत,
A + B म्हणजे A हा Bचा मुलगा आहे,
A # B म्हणजे A हा Bची बहिण आहे',
A x B म्हणजे A हा Bची पत्नी आहे' आणि
A & B म्हणजे A हे Bचे वडील आहेत'
वरील आधारावर, 'S + G & J # K x T' असेल, तर Sचा Tशी काय नाते असेल?

- A. पत्नीचे वडील
- B. वडिल
- C. भाऊ
- D. पत्नीचा भाऊ ✓

**Q25**

दोन पाईप एक टाकी स्वतंत्रपणे अनुक्रमे 99 मिनिटांत आणि 90 मिनिटांत भरू शकतात. तिला रिकामी करणारा एक पाईप टाकीच्या तळाशी आहे. तिन्ही पाईप एकाच वेळी उघडले तर रिकामी टाकी 50 मिनिटांत भरते. जर दुसरा कोणताही पाईप उघडला नसेल तर टाकीच्या तळाशी असलेल्या पाईपला पूर्णपणे भरलेली टाकी रिकामी करण्यासाठी किती वेळ लागेल ?

- A. 815 मिनिटे
- B. 825 मिनिटे ✓
- C. 841 मिनिटे
- D. 822 मिनिटे

**Q26**

2011च्या जनगणनेनुसार सपाट मैदाने, सुपीक माती आणि मुबलक पाऊस यामुळे खालीलपैकी कोणते राज्य लोकसंख्येची अधिक घनता असलेले राज्य आहे?

- A. केरळ ✓
- B. गुजरात
- C. हिमाचल प्रदेश
- D. राजस्थान

**Q27**

ट्रेन A ही 7:20 a.m. ला M स्टेशनवरून निघते आणि त्याच दिवशी 3:20 p.m. ला N स्टेशनवर पोहोचते. ट्रेन B ही 9:20 a.m. ला N स्टेशनवरून निघते आणि त्याच दिवशी 4:20 p.m. ला M स्टेशनवर पोहोचते. तर A आणि B ट्रेन कधी भेटतील ते शोधा.

- A. 12:08 p.m. ✓
- B. 1:38 a.m.
- C. 4:10 p.m.
- D. 10:57 a.m.

**Q28**

दिलेल्या मालिकेतील प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय यायला हवे?

57 58 62 71 87 112 ?

- A. 76
- B. 148 ✓
- C. 144
- D. 137

**Q29**

दंतीदुर्गाने खालीलपैकी कोणत्या राजवंशाची स्थापना केली?

- A. चोळ
- B. गुर्जर प्रतिहार
- C. पाल
- D. राष्ट्रकूट ✓

**Q30**

घराच्या वरच्या बाजूला एक खांब उभा आहे, घराची उंची 25 m आहे. बिंदू P पासून घराच्या वरच्या भागाचा उन्नत कोन 45° आहे आणि खांबाच्या वरच्या भागाचा उन्नत कोन 60°आहे. बिंदू P हा जमिनीच्या पातळीवर आहे,तर खांबाची उंची किती असेल (मीटरमध्ये) ?

- A. [IMG]
- B. [IMG]
- C. [IMG]
- D. [IMG] ✓

**Q31**

H, I, J, K, Q, R आणि S या सात खोक्यांना एकमेकांवर ठेवलेले आहे, परंतु ते त्याच क्रमाने ठेवले असतील असेही नाही. 'H' हा खोका तळाकडून दुसऱ्या क्रमांकावर ठेवला आहे. 'H' आणि 'S' यांच्यामध्ये केवळ तीन खोके ठेवलेले आहेत. J हा Hच्या खाली ठेवण्यात आलेला आहे. S आणि Rच्या मध्ये Q हा खोका ठेवण्यात आला आहे. K हा खोका Sच्या वर ठेवण्यात आलेला आहे.
I आणि J ह्या खोक्यामध्ये किती खोके ठेवण्यात आले आहेत?

- A. तीन
- B. दोन
- C. एक ✓
- D. चार

Blackbook Vocabulary — Now in the App! ► Download Now on Google Play

**Q32**

भारत सरकारने स्थापन केलेली कोणती संस्था मार्च 2025 पर्यंत भारताच्या अंतराळ उपक्रमांमध्ये खाजगी क्षेत्राचा वाढता सहभाग सुलभ करण्यासाठी नियामक आणि प्रचारात्मक संस्था म्हणून काम करते?

A. अंतराळ विभाग (DoS)

B. भारतीय राष्ट्रीय अंतराळ संवर्धन आणि प्राधिकरण केंद्र(IN-SPACe) ✓

C. भारतीय अंतराळ संशोधन संस्था(ISRO)

D. स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटर (SAC)

**Q33**

आजपासून तीन वर्षांपूर्वी, अमनचे वय चमनच्या वयाच्या चौपट होते. आजपासून तीन वर्षांनंतर, त्याचे वय चमनच्या वयाच्या दुप्पट असेल. तर अमनचे सध्याचे वय (वर्षांमध्ये) किती असेल?

A. 20

B. 18

C. 10

D. 15 ✓

**Q34**

कमाल 100 गुण असलेल्या परीक्षेत, Bला 54 आणि Aला 75 गुण मिळाले. तर Aच्या गुणांच्या अंदाजे किती टक्के Bचे गुण असतील?

A. 101.07%

B. 138.89% ✓

C. 72%

D. 75%

**Q35**

कोणत्या सुधारणा अधिनियमाद्वारे भारतात न्यायाधिकरणे स्थापन करण्यास सक्षम करणारी सांविधानिक तरतूद लागू करण्यात आली?

A. बेचाळीसावा सुधारणा अधिनियम, 1976 ✓

B. चव्वेचाळीसावा सुधारणा अधिनियम, 1978

C. बावन्नावा सुधारणा अधिनियम, 1985

D. एकेचाळीसावा सुधारणा अधिनियम, 1975

**Q36**

सरळ रूप द्या: $x(5x - 5) + 7(x^2 - 2) + 15$

A. 12×2 − 5x + 1 ✓

B. −12×2 − 5x + 1

C. −12×2 − 5x − 1

D. 12×2 − 5x − 1

**Q37**

खालील संख्यांच्या मालिकेचा संदर्भ घ्या आणि पुढील प्रश्नाचे उत्तर द्या (सर्व संख्या केवळ एक अंकी संख्या आहेत).

(डावी बाजू) 8 8 4 7 5 5 3 2 9 8 6 4 5 3 8 4 5 8 9 1 5 7 4 9 7 5 1 (उजवी बाजू)

या मालिकेत, ज्यांच्या लगत आधी विषम संख्या आहे आणि लगत नंतरही विषम संख्या आहे, अशा किती सम संख्या आहेत?

A. 2

B. 0

C. 3 ✓

D. 4

**Q38**

दिलेली मालिका तार्किकदृष्ट्या पूर्ण होण्यासाठी प्रश्नचिन्हाच्या (?) जागी खालीलपैकी कोणता अक्षर-संख्या समूह येईल?

MID 6; OKF 12; QMH 18; SOJ 24; ?

A. URL 30

B. UPL 32

C. UQL 30 ✓

D. SRL 28

**Q39**

जर A आणि B एकत्रितपणे एक काम 10 दिवसांत पूर्ण करू शकत असतील, आणि एकटा B ते काम 15 दिवसांत पूर्ण करू शकत असेल, तर एकट्या A ला ते काम पूर्ण करण्यासाठी किती दिवस लागतील?

A. 20 दिवस

B. 25 दिवस

C. 30 दिवस ✓

D. 15 दिवस

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in

**Q40**

जर '+' व '−' यांची आणि '×' व '÷' यांची अदलाबदल केली, तर खालील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

3 ÷ 2 + 15 × 3 - 5 = ? + 10

A. 13

B. 16 ✓

C. 17

D. 15

**Q41**

इंग्रजी वर्णक्रमावर आधारित दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय यायला हवे?

ULE RHZ ODU LZP ?

A. HUL

B. JWK

C. IVK ✓

D. HWJ

**Q42**

एका हेल्थ क्लबात, 55% सदस्य स्त्रियां आणि 45% सदस्य पुरुष आहेत. पुरुषांचे सरासरी वय 95 वर्षे आणि स्त्रियांचे सरासरी वय 85 वर्षे असेल, तर सर्व सदस्यांचे सरासरी वय (वर्षांत) किती असेल?

A. 83.9

B. 87.8

C. 79.3

D. 89.5 ✓

**Q43**

जर '+' व '−' यांची आणि '×' व '÷' यांची अदलाबदल केली, तर खालील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

692 − 438 ÷ 1488 × 372 + 257 ÷ 621 × 69 = ?

A. 131 ✓

B. 313

C. 113

D. 311

**Q44**

भारतीय संविधानातील खालीलपैकी कोणते अनुच्छेद राज्य धोरणांच्या निदेशक तत्वांशी निगडीत आहेत?

A. अनुच्छेद 46 ते 51

B. अनुच्छेद 36 ते 51 ✓

C. अनुच्छेद 66 ते 51

D. अनुच्छेद 56 ते 51

**Q45**

नितीन Y स्थानापासून गाडी चालवण्यास सुरुवात करतो आणि दक्षिणेकडे 13 km जातो. त्यानंतर तो उजवीकडे वळण घेत, 59 km गाडी चालवतो, नंतर तो डावीकडे वळण घेत 49 km गाडी चालवतो. त्यानंतर तो पुन्हा डावीकडे वळतो आणि 21 km गाडी चालवतो. त्यानंतर तो पुन्हा डावीकडे वळण घेत, 37 km गाडी चालवतो. त्यानंतर तो उजवीकडे वळण घेत, 38 km गाडी चालवतो, नंतर पुन्हा उजवीकडे वळतो आणि 23 km गाडी चालवल्यानंतर Z स्थानावर थांबतो. तर Y स्थानावर पुन्हा पोहोचण्यासाठी त्याला किती अंतर (सर्वात कमी अंतर) आणि कोणत्या दिशेने गाडी चालवावी लागेल? (निर्दिष्ट केलेले नसतील तोवर सर्व वळणे केवळ 90° वळणे आहेत.)

A. दक्षिणेकडे 51 km

B. दक्षिणकडे 49 km

C. उत्तरेकडे 48 km ✓

D. उत्तरेकडे 43 km

**Q46**

इंग्रजी वर्णक्रमानुसार, EFHE हे एका विशिष्ट प्रकारे IJLI शी संबंधित आहे. त्याचप्रमाणे, IJLI हे MNPM शी संबंधित आहे. त्याच तर्कानुसार PQSP कोणत्या पर्यायांशी संबंधित आहे?

A. TUVT

B. TVVY

C. TUWT ✓

D. TTVT

**Q47**

खालीलपैकी कोणती क्रीडा संज्ञा क्रिकेटशी संबंधित **नाही**?

A. पॉवरप्ले

B. LBW

C. कव्हर ड्राइव्ह

D. रेडर ✓

Blackbook Vocabulary — Now in the App! ► Download Now on Google Play

**Q48**

मे 2025 पर्यंत भारतातील सर्वात मोठे संवर्धन राखीव क्षेत्र असलेले त्साराप चू संवर्धन राखीव क्षेत्र खालीलपैकी कोणत्या राज्यात आहे?

A. आंध्रप्रदेश

B. हिमाचल प्रदेश ✓

C. आसाम

D. अरुणाचल प्रदेश

**Q49**

A, B आणि C या तीन व्यक्तींत ₹9,900 वाटायचे आहेत. A आणि C यांच्या वाट्याचे गुणोत्तर 4 : 18 असेल आणि Bचा वाटा हा A आणि C च्या एकूण वाट्याच्या 50% असेल, तर Bचा वाटा (₹ मध्ये) किती असेल?

A. 3,302

B. 3,301

C. 3,298

D. 3,300 ✓

**Q50**

खालील अक्षरमालिका पहा आणि पुढील प्रश्नाचे उत्तर द्या. (मोजणी ही डावीकडून उजवीकडेच करायची आहे.)

(डावी बाजू) K O P Q W S E D G U J I O P K M N V Y I P O (उजवी बाजू)

या मालिकेत, ज्यांच्या लगत आधी स्वर आहे आणि लगत नंतरही स्वर आहे, अशी किती व्यंजने आहेत?

A. एक

B. दोनपेक्षा अधिक

C. दोन ✓

D. एकही नाही

**Q51**

एक दुकानदार वस्तूच्या छापील किंमतीवर 15% ची व्यापार सवलत देतो. जर या उत्पादनाची छापील किंमत ₹6500 असेल, तर त्याची विक्री किंमत (₹ मध्ये) किती असेल?

A. 5552

B. 5200

C. 5525 ✓

D. 5255

**Q52**

एक ट्रेन प्रत्येकी 180 km अंतराचे तीन समान टप्पे अनुक्रमे 45 km/hr, 60 km/hr आणि 90 km/hr या वेगाने पार करते. हे तीनही टप्पे पार करण्यासाठी तिला एकूण किती वेळ लागेल?

A. 3.5 तास

B. 9 तास ✓

C. 4.5 तास

D. 7 तास

**Q53**

इंग्रजी वर्णमालाक्रमावर आधारित, खालील चारपैकी तीन अक्षर-समूहाची जोड्यांत एका विशिष्ट प्रकारे समानता आहे आणि त्यानुसार त्या एक गट तयार करतात. तर ह्या गटात न बसणारी अक्षर-समूहाची जोडी निवडा. (सूचना: गटात न बसणारी अक्षरसमूह जोडी ही तिच्या व्यंजन/स्वरांच्या संख्येवर किंवा अक्षरसमूहातील तिच्या स्थानावर आधारीत नाही.)

A. CL – GI

B. AJ – EG

C. YH – CE

D. HN – TV ✓

**Q54**

खालीलपैकी कोणता, दारिद्र्य कमी करण्याच्या, भारत सरकारच्या तीन दृष्टिकोनांपैकी एक **नाही**?

A. अतिरिक्त मालमत्ता निर्माण करून आणि कामाची निर्मिती करून गरीबांचे उत्पन्न आणि रोजगार वाढवणे.

B. विविध स्तरांच्या कौशल्यांसह कामगारांसाठी किमान मानधन किंवा वेतनाची खात्री करून देणे. ✓

C. आर्थिक विकास गरिबांपर्यंत पोहोचेल या अपेक्षेसह विकासाभिमुख दृष्टिकोन.

D. सामाजिक वापराच्या गरजांवर सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून लोकांना किमान मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

**Q55**

देशाच्या बहुतेक भागांत ________ हा नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा कालावधी पावसाळा म्हणून ओळखला जातो.

A. जून ते ऑक्टोबर

B. मे ते ऑगस्ट

C. जून ते ऑगस्ट

D. जून ते सप्टेंबर ✓

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in

**Q56**

पाठवल्या जाणाऱ्या बहुतांश ईमेलमध्ये, ईमेल संलग्नकांसाठी, सामान्यतः स्वीकृत कमाल आकार (मर्यादा) किती असते?

- A. 25MB ✓
- B. 10MB
- C. 100MB
- D. 50MB

**Q57**

दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

30 40 50 60 70 ?

- A. 78
- B. 79
- C. 80 ✓
- D. 77

**Q58**

जनुकाच्या पर्यायी रूपांसाठी कोणता शब्द वापरला जातो?

- A. गुणसूत्र
- B. जीनोम
- C. ॲलील ✓
- D. लोकस

**Q59**

एका विशिष्ट सांकेतिक भाषेत, 'pull bush map' हे 'hn ha lv' असे आणि 'kite input pull' हे 'ha of bq' असे संकेतबद्ध केले असेल, तर दिलेल्या सांकेतिक भाषेत 'pull' हे कसे संकेतबद्ध केले जाईल?

- A. ha ✓
- B. of
- C. lv
- D. hn

**Q60**

'I' म्हणजे '+', 'J' म्हणजे '×', 'K' म्हणजे '÷' आणि 'L' म्हणजे '−', तर पुढील समीकरणात प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

174 K 6 J 12 I 63 L 15 K 5 I 29 J 4 K 2 L 11 = ?

- A. 455 ✓
- B. 513
- C. 491
- D. 574

**Q61**

खालीलपैकी कोणता घटक मानव विकास निर्देशांक (HDI) चा भाग नाही?

- A. दीर्घ आणि निरोगी जीवन
- B. शिक्षण आणि ज्ञानाचे संपादन
- C. लष्करी ताकद आणि संरक्षण खर्च ✓
- D. राहणीमानाचा दर्जा आणि संसाधनांवर नियंत्रण

**Q62**

खालीलपैकी कोणत्या राज्यात बोकारो पोलाद प्रकल्प आहे?

- A. बिहार
- B. छत्तीसगढ
- C. झारखंड ✓
- D. पश्चिम बंगाल

**Q63**

मंदिर वास्तुकलेच्या कोणत्या शाखेत मंदिराच्या मंडपाला 'जगमोहन' असे संबोधले जाते?

- A. पाल मंदिर वास्तुकला
- B. ओडिशा मंदिर वास्तुकला ✓
- C. खजुराहो मंदिर वास्तुकला
- D. सोलंकी मंदिर वास्तुकला

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in

**Q64**

अतुल दरमहा ₹16,000 मिळवतो. तो दरमहा ₹5,500 भाड्यावर, ₹2,500 देयकांवर खर्च करतो आणि उर्वरित रकमेची बचत करतो. त्याने एका महिन्यात त्याची संपूर्ण मासिक बचत त्याच्या वाढदिवस साजरा करण्यासाठी वापरली, तर त्याची वर्षभराची एकूण बचत (₹ मध्ये) काढा.

A. 96,000

B. 80,000

C. 88,000 ✓

D. 72,000

**Q65**

अमरावती, भवानी, हेमावती आणि कबिनी या खाली दिलेल्यांपैकी कोणत्या नदीच्या मुख्य उपनद्या आहेत?

A. तापी

B. ब्रह्मपुत्रा

C. सिंधू

D. कावेरी ✓

**Q66**

युनायटेड नेशन्स ऑफिस ऑन ड्रग्स अँड क्राईम (UNODC) आणि UN वुमेनने UN मध्ये प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, 2024 मध्ये जगभरात दर किती कालावधीला एक महिला किंवा मुलगी तिच्या घनिष्ठ जोडीदाराकडून किंवा कुटुंबातील सदस्यांकडून मारली गेली?

A. दर पाच मिनिटाला

B. दर दहा मिनिटाला ✓

C. दर तासाला

D. दर 30 मिनिटाला

**Q67**

2025 मध्ये तिसरी महिला प्रीमियर लीग कोणत्या संघाने जिंकली?

A. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू

B. गुजरात जायंट्स

C. दिल्ली कॅपिटल्स

D. मुंबई इंडियन्स ✓

**Q68**

लोकअदालती कोणत्या प्रकारच्या ठरवाला प्रोत्साहन देऊन वादांचे सलोख्याने निराकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवतात?

A. विरोधी

B. सलोख्याचा/तडजोड करणे ✓

C. अनिवार्य आदेश

D. फौजदारी

**Q69** ENGLISH

The Main Worker is a person who works for:

A. at least 183 days (or six months) in a year ✓

B. at least 153 days (or five months) in a year

C. at least 90 days (or three months) in a year

D. at least 120 days (or four months) in a year

**Q70**

दोन संख्यांचा मसावि आणि लसावि अनुक्रमे 49 आणि 490 आहेत. जर एक संख्या 245 असेल, तर दुसरी संख्या शोधा.

A. 147

B. 49

C. 196

D. 98 ✓

**Q71**

I, J, K, L, R, S आणि T हे एका वर्तुळाकार टेबलाभोवती टेबलाच्या केंद्राकडे तोंड करून बसले आहेत.
K च्या उजवीकडून मोजले असताना K आणि T यांच्यामध्ये केवळ दोन व्यक्ती बसल्या आहेत. Lच्या उजवीकडून मोजले असताना S आणि L मध्ये केवळ तीन व्यक्ती बसल्या आहेत. T ही व्यक्ती L च्या लगत उजवीकडे बसली आहे. J ही व्यक्ती Rच्या लगत उजवीकडे बसली आहे. तर I च्या उजवीकडे चौथ्या क्रमांकावर कोणती व्यक्ती बसली असेल?

A. J ✓

B. L

C. S

D. T

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play
generated by rank.qmaths.in

**Q72**

खालीलपैकी कोणता, भारतीय संविधानाच्या III भागात दिलेल्या सहा मूलभूत अधिकारांपैकी एक अधिकार **नाही**?

A. समानतेचा अधिकार

B. धार्मिक शिक्षणाचा अधिकार ✓

C. स्वातंत्र्याचा अधिकार

D. शोषणाविरूद्धचा अधिकार

**Q73**

बालिमेळा पॉवर प्लांट भारतातील खालीलपैकी कोणत्या राज्यात आहे?

A. झारखंड

B. ओडिशा ✓

C. छत्तीसगड

D. आंध्र प्रदेश

**Q74**

2019 च्या नागरिकत्व (सुधारणा) अधिनियमांतर्गत, जर _______, तर परदेशस्थ भारतीय नागरिक (OCI) नोंदणी रद्द केली जाऊ शकते.

A. परदेशस्थ भारतीय नागरिक औपचारिकपणे दुहेरी नागरिकत्वाचा दर्जा मागत असेल

B. परदेशस्थ भारतीय नागरिक करविषयक जबाबदाऱ्यांचे पालन करण्यास नकार देत असेल

C. परदेशस्थ भारतीय नागरिक कायमस्वरूपी दुसऱ्या देशात स्थलांतरित झाला असेल

D. परदेशस्थ भारतीय नागरिक नागरिकत्व अधिनियम किंवा कोणत्याही अधिसूचित कायद्याचे उल्लंघन करत असेल ✓

**Q75**

दिलेल्या मालिकेत प्रश्नचिन्हाच्या (?) जागी काय येईल?

16, 26, 39, 55, 74, ?

A. 103

B. 100

C. 96 ✓

D. 90

**Q76**

कर्नाटक खादी आणि ग्रामोद्योग संयुक्त संघ (KKGSS) हा, निर्भेळ (प्यूअर) खादीपासून तिरंगी ध्वज तयार करण्याची कायदेशीररित्या परवानगी असलेला एकमेव विभाग (कारखाना) आहे, तो कोणत्या ठिकाणी आहे?

A. बेलूर

B. बदामी

C. बेंगेरी ✓

D. गोकर्ण

**Q77**

दिलेली विधाने आणि निष्कर्ष लक्ष्यपूर्वक वाचा. विधानांत दिलेली माहिती सामान्यतः ज्ञात तथ्यांपेक्षा वेगळी असल्याचे आढळली, तरी ती सत्य आहे, असे गृहीत धरून, दिलेल्या निष्कर्षांपैकी कोणता/ते निष्कर्ष दिलेल्या विधानांशी तर्कसंगत आहे/आहेत ते ठरवा.

**विधाने:** काही बल्ब लाईट आहेत. सर्व बल्ब मॅग्नेट आहेत.

**निष्कर्ष:**
(I) किमान काही मॅग्नेट लाईट आहेत.
(II) काही मॅग्नेट लाईट आहेत.

A. केवळ निष्कर्ष (II) तर्कसंगत आहे

B. केवळ निष्कर्ष (I) तर्कसंगत आहे

C. निष्कर्ष (I) किंवा निष्कर्ष (II) यापैकी एकही तर्कसंगत नाही

D. निष्कर्ष (I) आणि निष्कर्ष (II) हे दोन्ही तर्कसंगत आहेत ✓

**Q78**

प्रवाहाच्या दिशेचा वेग 115 km/hr आणि प्रवाहाच्या विरुद्ध दिशेचा वेग 23 km/hr आहे. एखाद्या ठिकाणी जाऊन आणि परत येण्यासाठी एकूण 25 तास लागतात. तर बोटीने पार केलेले एकूण अंतर किती आहे?

A. [IMG]

B. [IMG]

C. [IMG] ✓

D. [IMG]

**Q79**

20% वार्षिक व्याजदराने 4 वर्षांत किती रकमेवर (₹ मध्ये) ₹1,560 सरळव्याज मिळेल?

A. 1.950 ✓

B. 3.900

C. 975

D. 1.248

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play

**Q80**

खालील संख्या मालिका पहा आणि पुढील प्रश्नाचे उत्तर द्या (सर्व संख्या केवळ एक अंकी संख्या आहेत). मोजणी केवळ डावीकडून उजवीकडे करायची आहे.

(डावी बाजू) 9 8 7 4 5 3 2 4 5 6 8 1 2 3 5 6 7 6 5 3 9 (उजवी बाजू)

या मालिकेत, ज्यांच्या लगत आधी पूर्ण वर्ग आहे आणि लगत नंतर विषम अंक आहे, असे किती सम अंक आहेत? (टीप: 1 हा देखील एक पूर्ण वर्ग आहे)

- A. एकही नाही
- B. दोन ✓
- C. तीन
- D. एक

**Q81**

एक शर्ट ₹850नां विकल्यावर एका व्यापाऱ्याला 5% तोटा झाला. तो ₹1,530नां विकल्यावर त्याला (व्यापाऱ्याला) x% फायदा होणार असेल, तर x चे मूल्य किती असेल?

- A. 81
- B. 86
- C. 61
- D. 71 ✓

**Q82**

2025 मध्ये खालीलपैकी कोणत्या पुरुष खेळाडूला 'वर्ल्ड ॲथलेट ऑफ द इयर' ने गौरवण्यात आले?

- A. मॉन्डो डुप्लांटिस ✓
- B. नीरज चोप्रा
- C. जेकब इंगेब्रिगस्टन
- D. नोहा लायल्स

**Q83**

मोहम्मद कासिम नानोटावी आणि राशिद अहमद गंगोही यांनी खालीलपैकी कोणत्या चळवळीची स्थापना केली?

- A. पागल पंथी चळवळ
- B. देवबंद चळवळ ✓
- C. शरिया चळवळ
- D. वहाबी चळवळ

**Q84**

U, V, W, X, E, F आणि G हे सात बॉक्स एकमेकांच्या वर ठेवले आहेत, परंतु याच क्रमाने ठेवले असतील असे नाही. G च्या खाली केवळ दोन बॉक्स ठेवले आहेत. V च्या वर केवळ एक बॉक्स ठेवला आहे. V आणि U यांच्या दरम्यान केवळ एक बॉक्स ठेवला आहे. X हा P च्या लगतच वर ठेवला आहे. W हा E च्या खालीलपैकी एका स्थानांवर ठेवला आहे. तर E आणि X यांच्या दरम्यान किती बॉक्स ठेवले असतील?

- A. एक
- B. चार
- C. दोन ✓
- D. तीन

**Q85**

जानेवारी 2025 ह्या महिन्यात, भारत सरकारचे केंद्रीय मंत्री राजीव रंजनसिंह यांनी सिक्कीमच्या ______ जिल्ह्यात सेंद्रिय मत्स्यपालन समूहाची सुरूवात केली आहे.

- A. गंगटोक
- B. सोरेंग ✓
- C. पाक्योंग
- D. मंगन

**Q86** ENGLISH

The 7-digit number 40A861B is divisible by 3. What is the minimum value of (A + B)?

- A. 3
- B. 5
- C. 2 ✓
- D. 1

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in

**Q87**

दिलेली विधाने आणि निष्कर्ष काळजीपूर्वक वाचा. विधानांमध्ये दिलेली माहिती सामान्यतः ज्ञात तथ्यांपेक्षा वेगळी असल्याचे आढळली, तरी ती सत्य आहे, असे गृहीत धरून, दिलेल्या निष्कर्षांपैकी कोणता/ते निष्कर्ष दिलेल्या विधानांशी तर्कसंगत आहे/आहेत ते ठरवा.

**विधाने:**
काही किंग्ज ड्रिल्स आहेत.
सर्व क्लॅम्प्स ड्रिल्स आहेत.

**निष्कर्ष:**
(I) काही किंग्ज क्लॅम्प्स आहेत.
(II) सर्व ड्रिल्स क्लॅम्प्स आहेत.

A. निष्कर्ष (I) किंवा निष्कर्ष (II) यापैकी एकही तर्कसंगत नाही. ✓
B. निष्कर्ष (I) आणि निष्कर्ष (II) हे दोन्ही तर्कसंगत आहेत.
C. केवळ निष्कर्ष (II) तर्कसंगत आहे.
D. केवळ निष्कर्ष (I) तर्कसंगत आहे.

**Q88**

एका विशिष्ट सांकेतिक भाषेत, 'bell poet visit' ' हे 'js vx gu' असे आणि 'yard visit queen' हे 'aw ks js' असे संकेतबद्ध केले असेल, तर दिलेल्या सांकेतिक भाषेत 'visit' हे कसे संकेतबद्ध केले जाईल?

A. aw
B. js ✓
C. gu
D. vx

**Q89**

कोणता मेमरी प्रकार नॉन-व्होलॅटाइल आहे आणि एम्बेडेड कंट्रोलर्समध्ये फर्मवेअर स्टोरेजसाठी सामान्यतः वापरला जातो?

A. फ्लॅश ROM ✓
B. L3 कॅशे
C. SRAM
D. DRAM

**Q90**

नागरिकत्व (सुधारणा) अधिनियम, 2019 विशेषतः कोणत्या शेजारील देशांतील अधिसूचित समुदायातील स्थलांतरितांना लागू होतो?

A. अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तान ✓
B. श्रीलंका, म्यानमार आणि पाकिस्तान
C. मालदीव, अफगाणिस्तान आणि भूतान
D. नेपाळ, भूतान आणि बांगलादेश

**Q91**

मानवी सेवनासाठी अन्नपदार्थ असुरक्षित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांना ___________ म्हणतात.

A. स्वादकारक (फ्लेवर एजन्ट)
B. अपमिश्र ✓
C. अन्न समावेशी (फूड ॲडिटिव्ह)
D. धोकादायक रसायन

**Q92** ENGLISH

Given the data set {x + 4, 2x - 3, 5x, x + 1, 3x + 2}, for x > 1, where x is a natural number, if the median is 7, what is the value of x?

A. 3 ✓
B. 4
C. 6
D. 2

**Q93**

खालीलपैकी कोणत्या दिनांकाला संयुक्त राष्ट्रांनी पहिला जागतिक स्वच्छ ऊर्जा दिन साजरा केला?

A. 6 जून 2020
B. 26 जानेवारी 2024 ✓
C. 6 जून 2018
D. 26 जानेवारी 2022

**Q94**

एका विशिष्ट सांकेतिक भाषेत,
A + B म्हणजे 'A हा B चा पिता आहे',
A − B म्हणजे 'A ही B ची पत्नी आहे',
A × B म्हणजे 'A हा B चा पुत्र आहे',
आणि A ÷ B म्हणजे 'A' ही 'B' ची कन्या आहे.

जर 'W × Z + Y ÷ X − Z' असेल तर X चा W शी काय संबंध आहे?

A. मुलीचा पती
B. मुलाची पत्नी
C. माता ✓
D. पत्नीची आई

Blackbook Vocabulary — Now in the App! ► Download Now on Google Play

**Q95**
खालीलपैकी कोणी 1857 च्या उठवाचे दिल्लीतून नेतृत्व केले?

A. नाना साहिब
B. बेगम हजरत महाल
C. मंगल पांडे
D. बहादूर शाह II ✓

**Q96**
लैंगिक समानता मानवी विकासात कसे योगदान देऊ शकते?

A. कामगारांची विविधता कमी करून
B. शिक्षण आणि कामगारवर्गातील महिलांच्या सहभागातील अडथळे दूर करून ✓
C. केवळ पुरुषप्रधान उद्योगांवर लक्ष केंद्रित करून
D. महिलांसाठीच्या संधी मर्यादित करून

**Q97**
खालील महितीचा मध्य शोधा : 12, 3, 18, 17, 4, 9, 17, 19, 20, 15, 8, 17, 2, 3, 16, 11, 3, 1, 0, आणि 5.

A. 9
B. 11
C. 10 ✓
D. 8

**Q98**
दोन पूरक कोनांपैकी मोठा कोन लहान कोनापेक्षा 16° ने मोठा आहे. तर लहान कोन किती (अंशांचा) असेल?

A. 82 ✓
B. 87
C. 72
D. 79

**Q99**
'आधुनिक भारतीय कलांचे जनक' म्हणून ओळखले जाणारे आणि शकुंतला, रंग रसिया सारख्या कलाकृतींसाठी प्रसिद्ध असणारे कोण आहेत?

A. अभनींद्रनाथ टागोर
B. राजा रवी वर्मा ✓
C. नंदलाल बोस
D. रवींद्रनाथ टागोर

**Q100**
संगणकाच्या परिभाषेत आद्याक्षरसंज्ञा 'ASCII' विस्तारित रुप काय आहे?

A. American Standard Code for International Interchange (अमेरिकन स्टँडर्ड कोड फॉर इंटरनॅशनल इंटरचेन्ज)
B. Advanced Standard Code for Information Interchange (ॲडव्हान्स्ड स्टँडर्ड कोड फॉर इन्फॉर्मेशन इंटरचेन्ज)
C. American Standard Code for Information Interchange (अमेरिकन स्टँडर्ड कोड फॉर इन्फॉर्मेशन इंटरचेन्ज) ✓
D. American Scientific Code for Information Interchange (अमेरिकन सायन्टिफिक कोड फॉर इन्फॉर्मेशन इंटरचेन्ज)

**Q101**
एक दुकानदार वस्तूची छापील किंमत तिच्या खरेदी किंमतीपेक्षा 90% जास्त लावतो. तर 71% नफा मिळवण्यासाठी छापील किंमतीवर किती टक्के सवलत द्यायला हवी?

A. 10% ✓
B. 11%
C. 13%
D. 8%

**Q102**
या प्रश्नात, एका प्रश्नानंतर (I) आणि (II) क्रमांकाची दोन विधाने आहेत. विधानांत दिलेली माहिती प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहे की नाही हे तुम्हाला ठरवायचे आहे. दोन्ही विधाने वाचा आणि योग्य उत्तर ठरवा.

प्रश्न: M, A, N, C आणि G या प्रत्येकी वेगवेगळ्या लांबी असलेल्या 5 काठ्या आहेत, त्या काठ्यांपैकी कोणत्या काठीची सर्वाधिक आहे?

विधाने -
(I) M ही A पेक्षा लहान आहे परंतु N पेक्षा लांब आहे.
(II) N ही C पेक्षा लांब आहे परंतु G पेक्षा लहान आहे.

A. या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी केवळ दुसऱ्या विधानातील डेटा पुरेसा आहे, तर पहिल्या विधानातील डेटा पुरेसा नाही.
B. I आणि II ही दोन्ही विधाने एकत्रितपणे (आणि केवळ I हे विधान किंवा केवळ II हे विधान नाही) या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी आहेत.
C. या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी केवळ I या विधानातील डेटा पुरेसा आहे, तर II या विधानातील डेटा पुरेसा नाही.
D. I आणि II ही दोन्ही विधाने या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी पुरेशी नाहीत. ✓

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play
generated by rank.qmaths.in

**Q103**

मार्च 2025 पर्यंतच्या माहितीनुसार, भारतातील एकूण अंदाजे नवीनीकरणयोग्य ऊर्जेच्या क्षमतेत, एनर्जी स्टॅटिस्टिक्स इंडिया 2025 च्या माहितीनुसार, कोणत्या नवीनीकरणयोग्य ऊर्जा स्त्रोताचा वाटा सर्वात मोठा आहे?

- **A.** सौर ऊर्जा
- **B.** जलविद्युत
- **C.** जीवभार ऊर्जा
- **D.** पवन ऊर्जा ✓

**Q104**

पूर्व वैदिक काळातील आर्य लोक, व्यवसायाने_____ होते.

- **A.** पुरोहीत
- **B.** मर्चंट आणि ट्रेडर
- **C.** मच्छीमार आणि शिकारी
- **D.** पशुचारक ✓

**Q105**

सोडवा : 30 + [{-9 × (26 - 14 + 6)}]

- **A.** -133
- **B.** -134
- **C.** -135
- **D.** -132 ✓

**Q106**

खालीलपैकी कोणता दिवस दरवर्षी 1 जानेवारीला साजरा केला जातो?

- **A.** जागतिक कुटुंब दिन ✓
- **B.** आंतरराष्ट्रीय योग दिन
- **C.** पृथ्वी दिन
- **D.** जागतिक आरोग्य दिन

**Q107**

10 संख्यांची बेरीज 612 असेल तर, त्यांची सरासरी काढा.

- **A.** 60.2
- **B.** 59.2
- **C.** 62.2
- **D.** 61.2 ✓

**Q108**

मुकुंदने बँकेत ₹57,000 जमा केले. जर पहिल्या वर्षी व्याजाचा दर वार्षिक 10% असेल आणि दुसऱ्या वर्षी तो वार्षिक 3% नी वाढला, तर 2 वर्षांत, वार्षिक आकारणीनुसार, त्याला किती चक्रवाढ व्याज (रुपयांमध्ये) मिळेल?

- **A.** 13,851 ✓
- **B.** 13,501
- **C.** 14,101
- **D.** 13,651

**Q109**

COURAGE या शब्दातील प्रत्येक स्वर इंग्रजी वर्णमालाक्रमानुसार त्याच्या नंतरच्या अक्षरात बदलला आणि प्रत्येक व्यंजन इंग्रजी वर्णक्रमानुसार त्याच्या आधीच्या अक्षराने बदलले. तर अशाप्रकारे तयार होणाऱ्या नवीन अक्षरांच्या गटात खालीलपैकी कोणते अक्षर उजवीकडून पाचवे असेल?

- **A.** U
- **B.** T
- **C.** A
- **D.** V ✓

**Q110**

एका चौरस क्षेत्राचे क्षेत्रफळ 1369 $m^2$ आहे. तर त्याची परिमिती (m मध्ये) किती असेल?

- **A.** 152
- **B.** 145
- **C.** 139
- **D.** 148 ✓

**Q111**

फेब्रुवारी 2025 मध्ये भारताचे माननीय उपराष्ट्रपती श्री जगदीप धनखड यांच्या हस्ते प्रकाशित झालेल्या 'I AM?', या पुस्तकाचे संकलन कोणी केले होते?

- **A.** PS रमण
- **B.** गोपीचंद पी. हिंदुजा ✓
- **C.** अरुण शौरी
- **D.** नमिता गोखले

Blackbook Vocabulary — Now in the App! ▶ Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in

**Q112**

इंग्रजी वर्णमालाक्रमावर आधारित, एका विशिष्ट तऱ्हेने TWSP हे MPLI शी संबंधित आहे. त्याच तऱ्हेने, LOKH हे EHDA शी संबंधित आहे. त्याच तर्काने PSOL हे दिलेल्या पर्यायांपैकी कोणाशी संबंधित असेल?

- **A.** ILHE ✓
- **B.** IKGE
- **C.** IMGM
- **D.** ILGE

**Q113**

पुढीलपैकी कोणता नियम असे सांगतो की, 'जोपर्यंत बाह्य बल लागू होत नाही, तोपर्यंत प्रत्येक वस्तू विराम अवस्थेत किंवा एकसमान गतीत राहील'?

- **A.** केप्लरचे ग्रहांच्या गतीचे नियम
- **B.** संवेग अक्षय्यतेचा सिद्धांत
- **C.** न्यूटनचा गतिविषयक पहिला नियम ✓
- **D.** न्यूटनचा गतीविषयक तिसरा नियम

**Q114**

$\frac{4}{7}, \frac{5}{21}$ आणि $\frac{8}{63}$ यांचा लसावि काढा.

- **A.** [IMG]
- **B.** [IMG]
- **C.** [IMG]
- **D.** [IMG] ✓

**Q115**

सोडवा :

$$\sqrt{\left(31+\sqrt{\left((15+\sqrt{\left(97+\sqrt{\left(7+\sqrt{(4)}\right)}\right)}\right)}\right)}$$

- **A.** 6 ✓
- **B.** 9
- **C.** 4
- **D.** 5

**Q116**

आतील व्यास 21 cm असणाऱ्या एका दंडगोलाकार पाईपमधून 8 m/s या वेगाने पाणी वाहते. 12m x 9m × 4.41m या परिमाणाची रिकामी आयताकृती टाकी भरण्यासाठी पाईपला मिनिटांमध्ये किती वेळ लागेल?

(गणिती नियमानुसार एक दशांश स्थानापर्यंत मर्यादित करून) ($\pi = \frac{22}{7}$ वापरा)

- **A.** 27.5 मिनिटे
- **B.** 30 मिनिटे
- **C.** 28.6 मिनिटे ✓
- **D.** 36.8 मिनिटे

Blackbook Vocabulary — Now in the App! ► Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in

**Q117**

दिलेल्या पदावलीला सरळरूप द्या.

$$3^5 - \left(\frac{1}{3}\right)^{-5} + \sqrt{\frac{27^{12} + 9^{13}}{27^6 + 9^{14}}}$$

A. [IMG]

B. [IMG]

C. [IMG] ✓

D. [IMG]

**Q118** ENGLISH

$$\sqrt{\frac{1764}{2025}} \times \sqrt{\frac{625}{441}} - \left(\frac{3}{4}\right)^{-2}.$$

A. $-\frac{22}{63}$

B. $-\frac{1}{3}$

C. $-\frac{2}{3}$ ✓

D. $\frac{26}{9}$

**Q119** ENGLISH

If $\alpha : \beta = 15 : 22$ and $\beta : \gamma = 12 : 13$, then what is the value of $\alpha : \beta : \gamma$?

A. 90 : 143 : 132

B. 90 : 66 : 143

C. 90 : 132 : 143 ✓

D. 45 : 66 : 143

**Q120**

एका शंकूच्या आकाराच्या टोपीच्या पायाचा व्यास 40 cm आणि उंची 21 cm आहे. टोपीच्या पृष्ठभागावर 112 पैसे प्रति sq. cm या दराने रंगविण्यासाठी (गणिती नियमानुसार एक दशांश स्थानापर्यंत मर्यादित करून) किती खर्च येईल? ($\pi = \frac{22}{7}$ वापरा)

A. [IMG]

B. [IMG] ✓

C. [IMG]

D. [IMG]

Blackbook Vocabulary — Now in the App! ► Download Now on Google Play

generated by rank.qmaths.in